सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १० एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## २६/११ हल्ल्याचा आरोपी तहव्वुर राणा भारतात दाखल विमानतळावरुन एनआयएने घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नवी दिल्ली**

मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वुर हुसेन राणाला अखेर भारतात आणण्यात आले. त्याला घेऊन येणारे खास विमान आज दिल्लीच्या पालम विमानतळावर उतरले. यानंतर त्याला विमानतळावरुन थेट राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) मुख्यालयात नेले जात आहे. तिथे तपास संस्थांच्या पथकाकडून त्याची चौकशी तहव्वुर राणा अनेक वर्षांपासून अमेरिकेत राहत होता. लष्कर-ए-तैयबा आणि डेव्हिड हेडलीशी संबंध असल्याने भारत गेल्या अनेक वर्षांपासून राणाच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न करत होता. आता अखेर या प्रयत्नांना यश आले अन् राणा भारतात दाखल झाला. अमेरिकेतून आलेले विशेष विमान दिल्ली विमानतळावर दाखल होताच राणाला एनआयएने अटक केले. यानंतर त्याला एनआयए मुख्यालयात नेले जात असून, तिथे त्याची चौकशी केली जाईल. यानंतर तहव्वुर राणाला तिहार तुरुंगात ठेवण्यात येणार आहे.

याबाबत एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न जाहीर करण्याच्या अटीवर सांगितले की, या प्रकरणी अमेरिकेच्या कोर्टाने माहिती न दिलेलं कुठलंही नवं कलम तहव्वूर राणाविरोधात दाखल करता येणार नाही.



अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, नियमानुसार ज्या खटल्याला म्हणजेच मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याला आधार बनवून राणा याला भारतात आणण्यात आलं आहे. त्यानुसार त्याच्याविरोधात केवळ मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचाच खटला चालणार आहे. तहव्वूर राणा याने इतर गुन्हे कबूल केले तरी त्याच्याविरोधात अन्य कुठलाही खटला दाखल होऊ शकणार नाही.दरम्यान, तहव्वूर राणा याला या संपूर्ण प्रकरणामध्ये कुठलाही जामीन मिळणार नाही. तसेच त्याला तुरुंगातून पॅरोलही दिली जाणार नाही. संपूर्ण सुनावणीदरम्यान, त्याला तुरुंगातच राहावं लागेल. तसेच भारतातील न्यायालयं जी शिक्षा देतील ती पूर्ण करावी लागेल. मात्र त्यामध्ये फाशीच्या शिक्षेचा अंतर्भाव नसेल.

**पाकिस्तानची पहिली प्रतिक्रिया**

तहव्वुर राणा हा पाकिस्तानी लष्कर/आयएसआयचा सदस्य आहे. त्याची २६/११ हल्ल्याच्या कटात थेट होती. दरम्यान, आता राणाच्या प्रत्यार्पणाबाबत पाकिस्तानकडून पहिली प्रतिक्रिया आली आहे. पाकिस्तानने तहव्वुर राणापासून स्वतःला दूर केले आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र कार्यालयाने एका निवेदनात म्हटले की, तहव्वुर राणाने गेल्या दोन दशकांत त्याच्या पाकिस्तानी कागदपत्रांचे नूतनीकरण केलेले नाही, त्यामुळे त्याचे कॅनेडियन नागरिकत्व अगदी स्पष्ट आहे.केली जाईल.

**२६/११ हल्ल्यात १६६ जणांचा मृत्यू**

तहव्वुर राणा हा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक असून, २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील मुख्य सूत्रधारांपैकी एक असलेल्या अमेरिकन नागरिक डेव्हिड कोलमनचा निकटवर्तीय होता. २६ नोव्हेंबर २००८ रोजी १० पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या गटाने मुंबईतील रेल्वे स्टेशन, दोन हॉटेल्सवर हल्ला केला होता. त्या हल्ल्यात सहा अमेरिकन नागरिकांसह एकूण १६६ लोक मारले गेले होते. त्याच प्रकरणात नोव्हेंबर २०१२ मध्ये पाकिस्तानी दहशतवादी अजमल कसाबला पुण्याच्या येरवडा तुरुंगात फाशी देण्यात आली.

## कृषीमंत्री कोकाटेंना उपमुख्यमंत्र्यांनी समज दिल्यानंतर मंत्रिपद वाटू लागले औटघटकेचे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई**

कृषिमंत्रिपदाचा कार्यभार सांभाळणारे आणि सतत वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत राहणारे माणिकराव कोकाटे यांना उपमुख्यमंत्री यांनी समज दिल्यानंतर आता त्यांना मंत्रिपद औटघटकेचे वाटू लागले आहे. मला मंत्रिपदाचे काही वाटत नाही, अशी निरवानिरवीची भाषा कोकाटे यांनी बोलून दाखविली आहे. चार-दोन गोष्टी चुकू शकतात, मी पण सामान्य माणूसच आहे, अशी उपरती कोकाटे यांना आली आहे. यामागे आपला हेतू स्वच्छ होता, अशी सारवासारवही केली आहे. यावरून कोकाटे मंत्रिपदाच्या जबाबदारीतून मुक्त होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत का, असा प्रश्न आता विचारला जात आहे.



पुण्यात बुधवारी (दि. ९) कृषी विभागातर्फे आयोजित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. त्यापूर्वी कृषिराज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी मंत्री काही काळासाठी असतो, मंत्री म्हणून पक्षाने दिलेली जबाबदारी कायमस्वरूपी नसते, त्यामुळे आम्ही आज मंत्री, तर उद्या सामान्य नागरिक असतो, या वक्तव्यावर कोकाटे यांनी आपल्या मनातील खदखद बोलून दाखविली. शेतकरी अनेक वर्षे कर्जाची परतफेड करत नाहीत आणि कर्जमाफीची वाट बघतात. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्यास त्यातून ते साखरपुडे आणि लग्न करतात, असे वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर कोकाटे चांगलेच अडचणीत आले. त्यावर विरोधी पक्षांनी चांगलीच आगपाखड केली.

मंत्रिमंडळातील सहकारी पक्षाचा मंत्री या नात्याने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांची माफीही मागितली. उपमुख्यमंत्री यांनीही पुण्यात पत्रकारांशी बोलताना सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना तोलूनमापून बोलावे असा सल्लाही दिला. त्यानंतर पवार यांनी कोकाटे यांना प्रत्यक्ष बोलावून चांगलीच समज दिल्याची चर्चा आहे. त्या पार्श्वभूमीवर कोकाटे यांना ही उपरती झाली आहे.

आपण काय काम करतो, आपल्याला काय जबाबदारी दिली आहे, हे जास्त महत्त्वाचे असल्याचे सांगून मंत्रिपद औटघटकेचे आहे. मंत्रिपदाचे आपल्याला काही वाटत नाही. मंत्रिपदाबाबत मला फार अपेक्षित नव्हते. आपल्याला काही वेगळे मिळवायचे आहे, असे काही नव्हते, जी जबाबदारी पक्षाने, नेत्याने व समाजाने दिली ती कर्तव्यभावनेने पार पाडायची आहे, अशी स्पष्टोक्तीही त्यांनी यावेळी दिली.

## अमरावती-मुंबई या विमानसेवेनंतर अमरावती-दिल्ली विमानसेवा होणार सुरु : चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

येत्या १६ एप्रिलपासून अमरावती विमानतळावरून प्रवासी विमानसेवा सुरू होणार आहे, ही अमरावतीकरांसाठी अत्यंत आनंदाची बाब आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर आणि मी या जिल्ह्याचा पालकमंत्री झाल्यानंतर अमरावतीहून पहिले विमान मुंबईच्या दिशेने झेपावणार आहे, याचा आपल्याला विशेष आनंद आहे. पश्चिम विदर्भाच्या विकासाचा मार्ग १६ तारखेला अमरावतीला उघडणार आहे. अमरावती-मुंबई या विमानसेवेनंतर इतर ठिकाणीही विमानसेवा सुरू केली जाणार आहे. अमरावती-दिल्ली विमानसेवा देखील सुरू करणार आहोत, असे आश्वासन महसूलमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरूवारी येथे दिले.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे होते. कार्यक्रमाला राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभा खोडके आदी उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, अमरावतीहून आता नियमित प्रवासी विमानसेवा सुरू होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी शुभारंभाच्या कार्यक्रमासाठी अमरावतीला येत आहोत. अमरावतीला विमानसेवेची सुविधा आवश्यक होती, ती आता पूर्ण झाली आहे. पश्चिम विदर्भाच्या विकासाचे दार खुले होणार आहे. आपला महाराष्ट्र, विदर्भ विकसित झाला पाहिजे, हे स्वप्न डॉ. पंजाबराव देशमुख यांनी बघितले होते. विशेषत: कृषी क्षेत्राचा विकास झाला पाहिजे, ही त्यांची तळमळ होती.

बावनकुळे म्हणाले, मी देखील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा माजी विद्यार्थी आहे. माझे शिक्षण या संस्थेच्या शाळेतच झाले आहे. माझ्याकडे महसूल विभाग आहे. संस्थेसाठी जमीन देण्यास मी तयार आहे. संस्थेसाठी एकाच ठिकाणी शैक्षणिक संकुल उभारायचे असेल, तर त्यासाठी देखील सरकार मदत करण्यास तयार आहे. या शिक्षण संस्थेला आधुनिक संसाधनांची गरज आहे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली, ती निश्चितपणे पूर्ण करण्यात येईल.

## अमरावती जिल्ह्यातील रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण मदत

### प्रवीण पोटे पाटील यांच्याकडून १० डायलीसिस मशीनचे दान प्रविण पोटे पाटील यांचे रुग्ण सेवेकरीता आणखी एक पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

श्री प्रवीण आर. पोटे पाटील, अध्यक्ष पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती , यांनी आपले आई- वडील स्व. सूर्यकांतादेवी व स्व. रामचंद्रजी पोटे पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ अमरावती शहरात दहा डायलीसिस मशीन दान दिली आहेत.या दहा डायलीसिस मशीनपैकी आठ मशीन डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पिटल येथे आजपासून रुग्णांच्या सेवेत अद्यावत करण्यात आल्या असून, या उपक्रमाचे लोकार्पण राज्याचे महसूलमंत्री व अमरावतीचे पालकमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील, कपिल आंडे व मान्यवर उपस्थित होतेअमरावती जिल्ह्यात मूत्रपिंड विकाराचे रुग्ण झपाट्याने वाढत असून, डायलिसिस सेवेची गरज भासणाऱ्या रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. ही गरज ओळखून श्री प्रवीण पोटे पाटील यांनी दहा डायलीसिस मशीन दान करण्याचा निर्णय घेतला. डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पिटल मध्ये या सेवेसाठी स्वतंत्र वार्डही तयार करण्यात आला आहे.या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ व गरजू रुग्णांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार उपचार मिळतील, असा विश्वास श्री प्रवीण पोटे पाटील यांनी व्यक्त केला.




श्री प्रवीण पोटे पाटील यांचे समाजकार्यातील योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. कोरोनाकाळात त्यांनी लाखो रुपयांचा खर्च करून महानगरपालिकेला रॅपिड अँटीजेन किट्स दिल्या, जिल्हा कोविड रुग्णालयात ७० लाख रुपये स्वतः खर्चून स्व. सूर्यकांतादेवी पोटे पाटील स्मृतीप्रित्यर्थ ऑक्सिजन प्लांट उभारला. तसेच त्यांनी कोरोना काळात अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू, ऑक्सिजन डिव्हाइसेस यांचेही वाटप केले. त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमध्ये भुज, बिहार, किल्लारी, कोल्हापूर आणि अमरावती जिल्ह्यातही त्यांनी सातत्याने मदतीचा हात पुढे केला आहे. इर्विन व डफरीन हॉस्पिटलसाठी ४० टीव्ही, २० वॉटर कुलर, १०० एसी, ४०० बेड कॉट्स व डेझर्ट कुलरचेही योगदान देऊन त्यांनी रुग्णांच्या सुविधांमध्ये भर घातली आहे.या कार्यातून श्री प्रवीण पोटे पाटील यांची समाजसेवा, सेवाभाव आणि लोककल्याणासाठी असलेली तळमळ अधोरेखित होते. त्यांच्या अशा दानशूर कार्यामुळे ते नेहमीच अमरावतीकरांच्या मनामध्ये खास स्थान राखून आहेत.

## मी फक्त आमदार, उपोषण करायला मोकळा; छगन भुजबळांनी नाराजी बोलून दाखवलीच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०पुणे**

पुण्यातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वाड्याच्या कामाची पाहणी करण्यासाठी अजित पवार गटाचे आमदार छगन भुजबळ आले होते. फुलेवाड्याच्या कामासाठी आंदोलन करावं लागतंय, याबाबत मंत्री पालकमंत्र्यांनाच विचारायला हवं. मी फक्त सरकारमधील घटक पक्षाचा आमदार आहे, त्यामुळे मी उपोषण करायला मोकळा असल्याचं आमदार छगन भुजबळांनी बोलून दाखवलंय. मंत्रिमंडळामध्ये छगन भुजबळांना स्थान न दिल्याने ते नाराज असल्याचं समोर आलं होतं. याबाबत त्यांनी अधिकृत भाष्य केलं नसून त्यांच्या या विधानावर ते अप्रत्यक्षपणे नाराज असल्याचं दिसून आलंय.




विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर राज्य सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार झाला. या मंत्रिमंडळामध्ये छगन भुजबळांना डावलण्यात आल्याने भुजबळ नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आलं. या मुद्द्यावरुन आमदार छगन भुजबळांनी आपली नाराजी उघड-उघड व्यक्त केलीयं. महात्मा फुले वाड्याच्या रखडलेल्या कामाच्या निमित्ताने पुन्हा एकदा छगन भुजबळांनी आपण फक्त आमदार असल्याचं म्हणत अप्रत्यक्ष खंतच व्यक्त केलीयं.

पुढे बोलताना भुजबळ म्हणाले, महात्मा फुले वाडा देशाला अर्पण करण्यात आला. त्याआधीपासून अनेक लोकं या ठिकाणी येतात. या ठिकाणी सभा घेण्यासाठी जागा नाही. अनेक वर्षे जागा मिळावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. हे काम १०० ते २०० कोटींचं आहे. अनेक वर्षे प्रयत्न करुनही यश येत असल्याचं पाहायला मिळत नसल्याचं छगन भुजबळांनी स्पष्ट केलंय.

## मी खुनात नाही, खंडणीही मागितली नाही; वाल्मीक कराडचा कोर्टात अर्ज; आजच्या सुनावणीत काय घडलं?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०बीड**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आजची सुनावणी संपली असून येत्या २४ तारखेला या प्रकरणी सुनावणी घेण्यात येणार आहे. आजच्या सुनावणीत सरकारी विशेष वकिलांकडून काही कागदपत्रे सादर करण्यात आली. त्यात देशमुखांच्या मारहाणीचा व्हिडिओ कोर्टात दिला आहे. परंतु हा व्हिडिओ बाहेर प्रसिद्ध होऊ नये, जर झाला तर त्यातून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी विनंती संतोष देशमुखांच्या बाजूने युक्तिवाद करणारे ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांनी कोर्टात केली.



आजच्या सुनावणीबाबत उज्ज्वल निकम यांनी म्हटलं की, न्यायालयाने आरोपींना त्यांचे म्हणणं मांडायला सांगितले आहे. येत्या २४ एप्रिलला त्यावर सुनावणी होईल. आजच्या सुनावणीत आरोपी वाल्मीक कराडची चल-अचल संपत्ती जप्त करण्यात यावी असा अर्ज कोर्टात दिला आहे. त्यावर वाल्मीककडून खुलासा दाखल करण्यात आला नाही. त्यानंतर यावर रितसर सुनावणी होईल. वाल्मीक कराडने कोर्टात अर्ज दाखल केला असून मी खूनात नाही, खंडणी मागितली नाही. मी कसा निर्दोष आहे असा केविलवाणा प्रयत्न केला आहे असं दिसून येते असंही निकम यांनी सांगितले.

तसेच सीआयडीने काही महत्त्वाची कागदपत्रे गोळा केली आहे. कराडसोबत इतर आरोपींच्या संपत्तीची चौकशी सुरू आहे. पुढील तपास सुरू असल्याने पूर्ण तपास झाल्यानंतर संपत्तीबाबत निर्णय घेण्यात येईल. मकोका कायद्यातंर्गत कराडची संपत्ती जप्त करावी असा अर्ज आम्ही दिला आहे. कोर्टात पुरावे नोंदवले जातील असं निकम यांनी म्हटलं आहे.


**आजच्या सुनावणीत काय घडलं?**

दरम्यान, आरोपी वाल्मीक कराडने कोर्टात अर्ज दाखल करून माझा या गुन्ह्याशी काही संबंध नाही त्यामुळे मला यातून मुक्त करावे अशी मागणी करणारा अर्ज आज कोर्टात दाखल केला. जेव्हा देशमुख यांची हत्या झाली, त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. हा व्हिडिओ कोर्टाकडून सुरक्षित ठेवण्यात आला आहे या २ महत्त्वाच्या घटना सुनावणीत घडल्या आहेत.

## सद्भावना यात्रेसाठी येणारे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नागपूर काँग्रेसमध्ये करणार महत्वपूर्ण ऑपरेशन!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० नागपूर**

काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झालेले हर्षवर्धन सपकाळ अद्याप नागपूमध्ये आले नाहीत. ते केव्हा येणार याची प्रतीक्षा आता लवकरच संपणार आहे. नागपूरमध्ये औरंगजेबाच्या कबरीच्या विरोधात झालेल्या आंदोलनावरून उसळलेली दंगल आणि त्यामुळे दोन धर्मांमध्ये निर्माण झालेले वितुष्ट दूर करण्यासाठी काँग्रेसने सदभावना यात्रा काढण्याचा निर्णय घेतला आहे. या यात्रेत प्रदेशाध्यक्ष सहभागी होणार आहेत. येत्या १६ एप्रिल रोजी ही यात्रा नागपूरमध्ये आयोजित करण्यात आली आहे.



या सद्भावना यात्रेच्या निमित्ताने शहरात येणारे प्रदेशाध्यक्ष सपकाळ हे पक्षसंघटनेतही महत्वपूर्ण बदल (ऑपरेशन) करण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर हर्षवर्धन सपकाळ विदर्भात आले. वर्धा येथील महात्मा गांधी यांच्या आश्रमाला त्यांनी भेटही दिली. मात्र, ते नागपूरमध्ये आले नव्हते. आता संवाद यात्रेचा माध्यमातून ते काँग्रेस कार्यकर्त्यांसोबत संवाद साधणार आहेत. विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाला होता. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राजीनामा दिला होता. त्यांची जागा सपकाळ यांना देण्यात आली आहे.

## संपादकीय ......

# कल्याणमित्र भगवान महावीर

*'अहिंसा' ही जीवनपद्धती, विचारपद्धती व कृतीतून जगण्याची जीवनशैली असून जैन परंपरेचा तो एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. भगवान महावीरांनी प्रत्येक जीवाकडे सम्यकदृष्टीने पाहण्याची शिकवण दिली. इच्छा आणि गरजा यांचा समतोल साधण्यासाठी अपरिग्रह हे जीवनसूत्र महत्त्वाचे ठरते.तंत्र प्रगतीसोबत मानवी जीवन अधिक सुलभ, संपन्न होत असले, तरी समाधानी, आनंदी होण्याचे ध्येय अद्याप दूरच राहिले आहे. काही मोजक्या ठिकाणी दिसणारी संपन्नता व व्यापक ठिकाणी दिसणारी विषमता याच्या सोबत सातत्याने चालणारी युद्धे, संघर्ष, इतरांचे हिरावून घेण्याची वृत्ती, निसर्गाची अतोनात लूट हेही आजचे वास्तव आहे. कोणत्या तत्त्व प्रणालीचा स्वीकार केल्याने सर्व मानवजात सहिष्णू, संपन्न, परस्परहित समजून घेऊन वैयक्तिक स्तरावर आनंद व सामाजिक स्तरावर विश्वास व शांती संपादन करू शकेल, यासाठी कल्याण मार्ग दर्शवणार्या भगवान महावीरांनी दिलेली जीवनमूल्ये आदर्शवत ठरतात. नवतंत्रज्ञानाचा सम्यक वापर हा महाविनाशाच्या टोकावरून परत फिरण्याचा मूलतंत्र ठरेल. 'जगा व जगू द्या' या शाश्वत विश्वकल्याणाचे तत्त्वज्ञान आचरणात आणण्याचा आग्रह धरणारे जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर हे प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेतील परीस ठरतात.*

*प्रयत्नवाद हा दैववाद व देववाद यापेक्षा श्रेष्ठ असून त्याग, निग्रह, सातत्य या सोपानाचा वापर करीत २,५०० वर्षांपूर्वीपासून शाश्वत मानवी मूल्ये केंद्रस्थानी ठेवणार्या भगवान महावीरांच्या मार्गावर वाटचाल करणे ही आता अपरिहार्य आवश्यकता आहे. ही मूलतत्त्वे समजून घेणे वैयक्तिक व सामाजिक कल्याणास उपयुक्त ठरते. 'अहिंसा' ही जीवनपद्धती, विचारपद्धती व कृतीतून जगण्याची जीवनशैली असून जैन परंपरेचा तो एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. भगवान महावीरांनी प्रत्येक जीवाकडे सम्यकदृष्टीने पाहण्याची शिकवण दिली. केवळ पशूंचा बळी न देणे अथवा मांसाहार न करणे एवढा मर्यादित अर्थ अहिंसेचा नाही. शारीरिक हिंसेपेक्षादेखील अधिक खोलवर परिणाम करणारी भावनिक हिंसा असते.*

*दुसर्याच्या मनास, त्याच्या भावनांनादेखील आपण शब्दातून अथवा कृतीतून दुःख न देता आपण आपल्या जीवन पद्धतीत हे आचरण मूल्य आणणे ही भावअहिंसा तेवढीच महत्त्वाची ठरते. दैनंदिन व्यवहारात अनेकवेळा अकारण केवळ अधिकार आहे म्हणून आपल्यापेक्षा कनिष्ठ असणार्यांवर तोंडसुख घेणारे आपण पाहतो. त्याची भूमिका, कृती बरोबर असू शकेल, हा विचारही भावहिंसा टाळू शकतो. केवळ अल्पशा कारणाने टोकाची कृती करणारे भावहिंसक तणावाचे, संघर्षाचे कारण बनवतात. कृती 'प्रतिक्रिया' न बनता 'प्रतिसाद' बनवण्याचा प्रयत्न आपणास व इतरासही फायद्याचा ठरतो. दुसर्याच्या विचाराला, विरोधकास केवळ म्हणणे पटत नाही म्हणून मान्यता देत नाही, ही विचार हिंसा आज प्रबळ होताना दिसते.*

*आपल्या इच्छा आणि गरजा यांचा समतोल साधण्यासाठी अपरिग्रह हे जीवनसूत्र महत्त्वाचे ठरते. प्रत्येकाच्या गरजा पूर्ण करता येतील; पण कुणा एकाच्या सर्व इच्छा पूर्ण करणे शक्य नाही, हे गरजा व अत्यंतिक हाव यातील भेद स्पष्ट करते. एका बाजूला जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यास असमर्थ असलेला मोठा समुदाय व दुसर्या बाजूला अब्जाधीशांच्या वाढती संख्या ही विषमता एकूण मानवी जीवनातील विसंगती दर्शविते. केवळ आर्थिक प्रगती हीच आपली यशस्वीता मानणारी धोरणे एका मोठ्या आरिष्टाकडे नेत आहे. अपरिग्रहाचा स्वीकार हाच त्यावर उपाय आहे. जैन मुनी संन्यासी या तत्त्वाचा अत्यंतिक वापर करून एक वेगळा आदर्श देत असले, तरी प्रत्येकाने अंशतः याचा स्वीकार केल्याने समृद्ध व समाधानी जीवनशैली निर्माण होऊ शकते. अपरिग्रह तत्त्वाचा वापर करून केलेला प्रवास हा आनंददायी असतो, हे किमान सामान घेऊन प्रवास करणार्यास चांगलेच माहीत आहे.*

विदर्भ प्रजासत्ताक

# भगवान महावीरांची लोकहितकारी विचारधारा




सर्व ग्रह सर्वोच्च स्थानात असताना चैत्र शुद्ध त्रयोदशीच्या दिवशी महाराजा सिद्धार्थ आणि महाराणी त्रिशला यांच्यासह सर्व जगताला सुखद करणारी महत्त्वाची घटिका आली. जगाला अहिंसेच्या परममंत्राचा उपदेश देणा–या भगवान महावीरांचा जन्म झाला. भगवान वर्धमान महावीर हे जैनांचे चोविसावे तीर्थंकर असले तरीही ते अवतार किंवा प्रेषित नव्हते. कारण प्रत्येक आत्म्यात तीर्थंकर किंवा महामानव बनण्याची क्षमता असते. ती क्षमता प्रत्येक जण स्वत:च्या प्रयत्नांनी मिळवू शकतो, ही शिकवण जैन धर्माने सुरुवातीपासूनच दिली आहे. याप्रमाणे हजारो जन्मांनंतर भगवान महावीरांनी सत्यत्व प्राप्त केले होते. यानंतर २७व्या भवात ते तीर्थंकर होऊ शकले. भगवान महावीरांच्या जन्माला जन्मकल्याणक म्हटले जाते. कारण जन्मकल्याणक हे आत्म्याला अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणारे असतात. सव्वीसशे वर्षांपूर्वी अशीच परिस्थिती घडली होती. ज्या समाजाची मुहूर्तमेढ प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेव आदींनी केली, ती समाजव्यवस्था बिकट होऊन गेली होती. अनिष्ट चालीरीतींनी समाजाला ग्रासले होते. कर्मानुसार हवी असलेली समाजव्यवस्था दूषित झाली होती.

समाजात उच्च व नीच अशी भेदभावाची दरी तयारी झाली होती. चातुर्वर्ण्य व्यवस्था इतकी बिकट झाली होती की एखाद्या शूद्राने वेदवचन म्हटले तरीही त्याला शिशाचा रस पाजला जाई. यज्ञयाग व कर्मकांडाचे स्तोम माजले होते. देवी–देवतांना खुश करण्यासाठी बळी देण्याची प्रथा रूढ होत होती. स्त्रीसुद्धा भोगविलासाचे साधन समजली जात होती. समाजाचा सर्वात मोठा घटक म्हणजे शूद्र अत्यंत रंजला–गांजला होता. 'पाषाणाला पुरणपोळी! आणि जित्या माणसाला शिवीगाळी!!' अशी अवस्था झाली होती. अन्यायग्रस्तांना या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी भगवान महावीरांची पावले राजभवनाबाहेर पडली. शाश्वत सुखाचा शोध घेण्यासाठी या महापुरुषाने रानावनाची वाट पकडली. प्रचंड यातना सोसत साडेबारा वर्षांची साधना आता फलद्रूप होणार होती. वैशाख महिन्यातील शुद्ध दशमी, दिवसाचा चौथा प्रहर, फाल्गुनी नक्षत्र, ऋतुजावलिका नदीचा किनारा, गोदोहन (विशिष्ट प्रकारातील आसन), आज होता भगवान महावीरांच्या जीवनातील परमोच्च क्षण. या क्षणालाच भगवान महावीरांना भूत–भविष्य आणि वर्तमान काळातील सर्वोच्च ज्ञान झाले होते. वर्धमान आता केवलज्ञानी झाले होते. त्यांचे अंतर्मन व बहिर्मन ज्ञानाने प्रकाशमान झाले होते.हा प्रवास इथेच थांबणार नव्हता. त्यांच्या साधनेचा उद्देशच मुळीच स्व–पर कल्याणाचा होता. दैवी गुणांचा परिपोष करणा–या समाजनिर्मितीचा त्यांच्या साधनेचा उद्देश होता. सर्वज्ञ भगवान महावीरांना जेव्हा सकल जनांनी विनंती केली, तेव्हा त्यांनी उपदेशाला प्रारंभ केला. तत्कालीन समाजाला समजणा–या अर्धमागधी भाषेत त्यांनी उपदेश केला. या उपदेशात कुठेही क्लिष्टता नव्हती, तर सर्वसमावेशकता होती. क्षमा, मार्दव, आर्जव, शुचिता, सत्य, संयम, तप, त्याग, निरासक्ती आणि शील यांचा दशलक्षणीय धर्म समाजोत्थानासाठी प्रतिपादित केला. श्रावक व श्राविका आणि श्रमण व श्रमणी अशा चतुर्विध संघाची स्थापना त्यांनी केली, म्हणून महावीर तीर्थंकर झाले. हा संघ म्हणजे तीर्थ व त्याची स्थापना करणारे म्हणून तीर्थंकर, असा भगवानांचा परिचय झाला. हा धर्म चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर अवलंबून नव्हता. विशुद्ध नीती, पवित्र रीती आणि सर्वसमावेशकता असलेला हा संघ अहिंसा तत्त्वावर बनलेला होता. कर्मानेच मनुष्य ब्राह्मण होतो व कर्मानेच तो क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र होतो, हा परम उपदेश होता. त्यांच्या धर्मसंघात चौदा सहस्र साधू, छत्तीस सहस्र साध्वी, एक लक्ष एकोणसाठ हजार श्रावक आणि तीन लाख अठरा सहस्र श्राविका होत्या. यात इंद्रभूती गौतम यांच्यासारखे विद्वान वैदिक ब्राह्मण होते, तर हरकेषी चांडाळही होते. हा धर्मसंघ सर्वसमावेशक होता.भगवान महावीर हे जैन धर्माचे संस्थापक नाही तर ते २४वे तीर्थंकर होते. तत्पूर्वी २३व्या तीर्थंकर भगवान पार्श्वनाथांचा उपासक समाजही महावीरांच्या धर्मसंघात सामील झाला. पहिले तीर्थंकर ऋषभदेवांच्या काळात या धर्मसंघाला श्रमण संघ म्हटले जात होते. २२वे तीर्थंकर नेमीनाथ यांच्या कालावधीत या संघाला अहर्त संघ संबोधले जायचे. तर आता या धर्मसंघाला जैन धर्म संघ संबोधले जाते. भगवान महावीरांचा अहिंसेसोबत अपरिग्रह हा सिद्धांतही अत्यंत महत्त्वाचा आहे. सत्य, संयम, तप, अहिंसा, क्षमा या गुणांवर आधारित हा धर्मसंघ संख्येपेक्षा गुणात्मकतेला अधिक प्राधान्य देत राहिला. अशा या लोकाभिमुख आणि लोकहितकारी विचारधारेच्या आचरणाची समाजात आज गरज आहे.

# उन्हाळ्यात पिकांच्या पाण्याची गरज कमी करण्यासाठी 'हे' कराच, वाचा सविस्तर

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

उन्हाळी हंगामातील जास्तीचे तापमान, कोरडे हवामान, सोसाट्याचा वारा, इ. कारणांमुळे जमिनीच्या पृष्ठभागावरून मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत असते. त्यामुळे इतर हंगामाच्या तुलनेत जमिनीतील ओल लवकर कमी होते.

त्याचप्रमाणे पिकाच्या माध्यमातून वातावरणात पाणी (थरींशी चरपरसशाशपीं) सोडण्याचे प्रमाणही उष्ण हवामानामुळे जास्त असते. एकूणच खरीप किंवा रब्बी हंगामाच्या तुलनेत उन्हाळी पिकांची पाण्याची गरज दुप्पट ते अडीच पट असते. त्याकरिता पिकांना वरचेवर पाणी द्यावे लागत असल्याने पाण्याच्या एकूण जास्त पाळ्या द्याव्या लागतात. उन्हाळी पिकांमध्ये पाण्याची बचत करण्याच्या दृष्टीने आच्छादनाच्या वापराला महत्त्व आहे. बाष्पीभवनाची क्रिया कमी करण्यासाठी आच्छादनाचा वापर करणे फायदेशीर ठरते. शेतातील उपलब्ध काडीकचरा, गव्हाचा भुसा, उसाचे पाचट, पिकाची धसकटे तसेच प्लास्टिकचा आच्छादन म्हणून वापर केल्यास पिकाची पाण्याची गरज ३० ते ४० टक्क्यांनी कमी होते तसेच पिकात तणांचा प्रादुर्भावही कमी राहतो.

**पाण्यावर नियंत्रण आणता येते....**

बाष्पनिष्कासन निरोधकाच्या वापराने जमिनीच्या पृष्ठभागावरून तसेच पिकाच्या पानावाटे निघून जाणाऱ्या पाण्यावर नियंत्रण आणता येते. त्यासाठी केओलीन पावडर ८ टक्के (१० लिटर पाण्यात ८०० ग्राम) या प्रमाणात पाण्यात मिसळून तयार झालेले द्रावण पिकावर फवारल्याने पिकाच्या

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

पानांवर पांढऱ्या रंगाचा थर तयार होतो. पिकावर पडणारी सूर्यकिरणे या पांढऱ्या रंगामुळे परावर्तित होतात. त्यामुळे पानाचे तापमान कमी होऊन पानावाटे होणारा पाण्याचा नाश आटोक्यात ठेवता येतो. पर्यायाने जमिनीतील ओल जास्त काळ टिकून ठेवण्यास मदत होते.




**ऊसाच्या पिकासाठी...**

उन्हाळी हंगामात पाण्याचा काटकसरीने वापर करण्याच्या दृष्टीने उसासारख्या पिकामध्ये शेंड्याकडील पूर्ण उघडलेली ६ ते ७ पाने ठेवून उसाची उरलेली खालच्या बाजूची पाने काढून टाकावीत. एकूण पानांची संख्या कमी केल्याने पानावाटे होणारे पर्णोत्सर्जन कमी करता येते. त्याचप्रमाणे उसाच्या पिकाला प्रत्येक पाण्याच्या पाळीत आलटून पालटून सरी भिजवून उन्हाळी हंगामात ऊस पिक किमान जगवता येते.


**– डॉ. कल्याण देवळाणकर,**
सेवानिवृत्त शास्त्रज्ञ कृषी विद्यापीठ




# सकाळी 'वॉकिंग' ला जाणं जास्त चांगलं? वाचा सविस्तर

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

दररोज कोणता ना कोणता शारिरीक व्यायाम झालाच पाहिजे, असा सल्ला तज्ज्ञ नेहमीच देतात. पण प्रत्येकाचं रुटीन, कामाची गडबड यातून व्यायामासाठी वेळ काढणं अनेकांना अवघड जातं. त्यामुळे मग काही जण इच्छा असूनही व्यायाम करू शकत नाही. तर काही जण अतिशय सोयीचा असणारा 'चालणे' किंवा हा व्यायाम निवडतात. सकाळची किंवा रात्रीची एखादी वेळ ठरवतात आणि त्या वेळेला नियमितपणे ठराविक अंतरावर जाऊन वॉकिंग करून येतात तुमच्याकडून इतर कोणताही व्यायाम होत नसेल तर चालायला जाणे कधीही चांगले पण त्यातही कोणत्या वेळी चालायला जाणे आरोग्यासाठी अधिक लाभदायी ठरू शकते, हे एकदा जाणून घ्यायला हवे.



**कोणत्या वेळी वॉकिंग करणं जास्त चांगलं?**

वॉकिंगला जाण्याची योग्य वेळ कोणती याविषयीची माहिती नुकतीच टाईम्स ऑफ इंडियाने प्रकाशित केली असून त्यानुसार रात्रीपेक्षा सकाळच्या वेळी फिरायला जाणे अधिक चांगले असे सांगण्यात आले आहे. त्यानुसार सकाळच्या वेळी सगळीकडे जास्त शांतता असते.अशा शांत वातावरणात फिरायला गेल्यास मन फ्रेश होते. शिवाय कोणताही गोंगाट, कलकलाट आजुबाजुला नसल्याने स्वत:शी संवाद साधायला वेळ मिळतो. यातून अनेक मानसिक लाभ होतात. मन शांत होते.सकाळच्या वेळी फिरायला जाण्याचा आणखी एक मुख्य फायदा म्हणजे सकाळी तुम्ही जेवढं लवकर घराबाहेर पडाल तेवढी शुद्ध हवा तुम्हाला मिळू शकते. हे तुमच्या फुफ्फुसांसाठी आणि हृदयासाठी जास्त चांगले ठरते. कारण सकाळी प्रदुषण कमी असल्याने हवा चांगली असते. रात्रीच्यावेळी मात्र सकाळच्या तुलनेत हवा बरीच प्रदुषित झालेली असते.

सकाळच्या कोवळ्या सुर्यप्रकाशात तुम्ही फिरायला जात असाल तर शुद्ध हवेसोबतच व्हिटॅमिन डी सुद्धा मिळते आणि हाडांच्या मजबुतीसाठी ते जास्त फायदेशीर ठरते. सकाळी तुम्ही अगदी फ्रेश असता. त्यामुळे अधिक चांगल्याप्रकारे वॉकिंग करू शकता. दिवसाची सुरुवात जोमात झाल्याने पुढे सगळा दिवस चांगला जातो आणि चालून आल्यानंतर जी एनर्जी मिळते ती पुढे दिवसभर कामातला उत्साह टिकवू ठेवण्यास मदत करते. त्यामुळे शक्य असेल तर रात्रीऐवजी सकाळीच चालायला जा..

# जिल्हा स्त्री रुग्णालय द्वितीय:उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्हा स्त्री रुग्णालयाचा सन्मान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती** – अमरावती आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) सोमवारी ७ एप्रिलला जागतिक आरोग्य दिनानिमित्त मुंबई येथे द्वितीय पुरस्काराने गौरवण्यात आले. सार्वजनिक आरोग्य विभागातील उत्तम कामगिरी करणारे रुग्णालय, गुणवत्तापूर्ण आश्वासक कार्यक्रमांतर्गत उत्तम कामगिरी करणाऱ्या संस्थांना मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयाला उल्लेखनीय कामगिरी केल्याच्या यशाबद्दल या हॉस्पिटलला द्वितीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य विभाग सचिव डॉ. विपुल विनायक, आरोग्य सेवा आयुक्तालयाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर प्रामुख्याने उपस्थित होते. रुग्णालयाला उत्तम कामगिरीसाठी स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

# 'विद्याभारती जेम्स'च्या वतीने उत्कृष्ट खेळाडूंचा केला सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती–** अमरावती विद्याभारती महाविद्यालयातील विद्याभारती जेम्सच्या वतीने उत्कृष्ट खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. या वेळी १६५ विद्यार्थ्यांना ट्रॅकसूट व इतर साहित्य वितरित केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. तनुजा राऊत, विद्याभारती शैक्षणिक मंडळाच्या उपाध्यक्ष मेजर प्रोफेसर डॉ. मिथिलेश राठौर, शैक्षणिक मंडळाचे सचिव डॉ. अशोक चौहान, कोषाध्यक्ष रघुनाथी रोडे, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पांडे, प्रतिभाताई पाटील शिक्षणशास्त्र कॉलेजचे प्राचार्य डॉ. किशोर शिरभाते, महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक. डॉ. डी. एस. वानखडे, जेम्सचे समन्वयक व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एच. के. शिसोदिया उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. तनुजा राऊत यांनी विद्यार्थ्यांना खेळांचे महत्त्व पटवून दिले. खेळ विद्यार्थ्याला केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम करत नाहीत, तर त्याच्या मानसिकतेला, सामूहिक कार्य करण्याच्या कौशल्याला आणि नेतृत्वगुणांना प्रोत्साहन देतो, हे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर म्हणाल्या, आजच्या काळात केवळ पुस्तकी ज्ञानावर आधारित शिक्षण पुरेसे नाही. सरकारी व कॉर्पोरेट क्षेत्रात विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये आवश्यक आहेत, जसे की खेळ, संगीत, कला, स्पर्धात्मक क्षेत्रांतील ज्ञान विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यादृष्टीने स्वत:ला तयार करावे. कोषाध्यक्ष रोडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान १६५ विद्यार्थ्यांना ट्रॅकसूट, मोमेंटो, प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वरी वानखडे यांनी केले, तर आभार कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एच. के. शिसोदिया यांनी मानले. या वेळी डॉ. साबीर अली, प्रा. अथर इक्बाल, डॉ. सूरज रोडे, प्रा. बैतुले यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.




आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# जिल्ह्यातील हवामान बदलले दिवसभर कडक ऊन आणि रात्री पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती–** बुधवारला दिवसभर ४२ अंशांच्या उष्णतेचे चटके सहन केल्यानंतर अमरावतीसह जिल्ह्यातील काही भागात संध्याकाळी विजांच्या कडकडाटात जोरदार वादळी अवकाळी पावसाने हजेरी लावली.

अचानक आलेल्या या पावसामुळे दाणादाण उडाली. तर वाऱ्यामुळे अनेकांच्या घरावरील नेटस् उडाल्या. दुसरीकडे जोरदार वाऱ्यासह पाऊस कोसळल्याने गेल्या तीन दिवसांपासून तीव्र उष्णतेमुळे त्रस्त असलेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. हवामान खात्याने अमरावतीसह विदर्भात पावसाचा अंदाज वर्तवल्याची माहिती आहे.

उल्लेखनीय असे की गेल्या ३-४ दिवसांपासून अमरावतीसह विदर्भातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये ४० अंशांपेक्षा जास्तकमाल तापमानाची नोंद होत आहे. उष्णता आणि सूर्यप्रकाशामुळे सकाळी १० वाजतानंतरच बाहेर पडणे कठीण झाले आहे. बुधवारीही अशीच परिस्थिती होती. अमरावती शहराचे कमाल तापमानदिवसभर ४२ अंशांवर पोहोचले होते.दिवसभर सूर्य जणू आग ओकत होता. त्यामुळे गरमीने जीव कासावीस झाला. मात्र संध्याकाळी अचानक



आकाशात ढग दाटून आल्याने आणि जोरदार वाऱ्यासह पाऊस पडल्यानेलोकांनाकडक उष्णतेपासून दिलासा मिळाला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार हवामानातील हा बदल पुढील २-३ दिवस राहिल. त्यानंतर पुन्हा उष्णतेच्या लाटा सुरु होईल.

प्रा. अनिल बंड यांच्या मते, १० एप्रिल रोजी अमरावती, यवतमाळ, वाशीमसह पूर्व विदर्भात काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. ११ एप्रिल रोजी यवतमाळ, वाशीमसह पूर्व विदर्भात वेगवेगळ्या ठिकाणी मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. १२ एप्रिल रोजी पूर्व विदर्भात वेगवेगळ्या ठिकाणी मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

### वाढत्या तापमानातही पावसाचा अंदाज

दरम्यान, हवामानशास्त्रज्ञ प्रा. अनिल बंड यांनी दैनिक वृत्त केसरीला सांगितले की, बंगालच्या उपसागरावर एक मोठा कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. १२ तासानंतर प्रथम वायव्येकडे आणि नंतर ईशान्येकडे वळण्याची शक्यता आहे. याशिवाय, गुरुवारी त्याची तीव्रता देखील कमी होईल. यासोबतच मध्य प्रदेश आणि मध्यप्रदेशात चक्राकार वारे वाहण्याची शक्यता आहे. यासोबतच, पुढील तीन ते चार दिवसविदर्भात कमाल तापमानातघटहोण्याची शक्यताप्रा. अनिल बंड यांनी व्यक्त केली आहे.

# अकोल्याचे सुपुत्र माजी आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे राजकारणात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अकोला** –माजी आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांनी हिंद सेना' नावाचा राजकीय पक्ष स्थापन करुन बिहारच्या राजकारणात एन्ट्री केली आहे. त्यांनी ८ एप्रिल रोजी पाटणा येथे हिंद सेना पक्षाची घोषणा केली आहे.

बिहारमध्ये भारतीय पोलिस सेवेत दबंग आयपीएस अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवलेल्या शिवदीप लांडे यांनी अखेर राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. बिहारच्या विधानसभा निवडणुकीची तयारी त्यांच्या पक्षाने सुरू केली आहे. २००६ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले लांडे यांची पोस्टिंग बिहारमध्ये झाली होती. १९ सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांनी अचानक पोलिस सेवेतून निवृत्तीची घोषणा केली होती. मात्र, जानेवारीमध्ये त्यांचा राजीनामा मंजूर झाला होता. मी बिहारमध्ये १८ वर्ष काम करून सेवा दिली. बिहार माझे कुटुंब आहे. जर माझ्याकडून नकळत काही चुकले असेल तर बिहारच्या जनतेने माफ करावे. आज मी पोलिस दलाचा राजीनामा देत आहे. पण बिहारसाठी यापुढेही काम करत राहिल, अशी पोस्ट तेव्हा लांडे यांनी समाजमाध्यमांवर लिहिली होती. आपण नोकरीची सुरुवात जय हिंद बोलून केली होती. त्याच उत्साहात आता राजकीय क्षेत्रात पदार्पण करत आहे. युवकांसाठी युवकांच्या माध्यमातून काम करणारा पक्ष, अशी आपल्या पक्षाची ओळख असेल. युवकाला आज बदल हवा आहे. पण हा बदल घडवणार कोण? असा प्रश्न आहे. आम्ही युवकांसाठी एक माध्यम बनू इच्छितो, असे त्यांनी पक्षाची घोषणा करतेवेळी सांगितले.




कोण आहेत लांडे? शिवदीप लांडे हे मूळचे पारस गावचे आहेत. शेतकरी कुटुंबातून आलेल्या शिवदीप लांडे यांचे शिक्षण अकोला जिल्ह्यात झाले. त्यानंतर त्यांनी शेगावमधील श्री संत गजानन महाराज इंजिनिअरिंग महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्समध्ये बीटेक केले. यानंतर यूपीएससीची तयारी करण्यासाठी त्यांनी मुंबई गाठली. आयपीएस झाल्यानंतर त्यांना बिहार कॅडर मिळाले होते. नक्षल प्रभावित असलेल्या मुंगेर जिल्ह्यातील जमालपूर येथे झाली. यानंतर लांडे यांनी पाटणा, अररिया, पूर्णिया, रोहतास अशा जिल्ह्यांमधे त्यांनी कामगिरी केली.

# नवनगर प्रकल्प जिल्ह्यासाठी महत्वाचा- पालकमंत्री

## शेगाव, सिंदखेडराजा, लोणार येथील पर्यटन वाढीवर भर देणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०सिंदखेडराजा–** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर कृषी समृद्धी नवनगर प्रकल्प सुरू करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. हा प्रकल्प बुलडाणा जिल्ह्यासाठी महत्त्वाचा आहे, असे मत जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी व्यक्त केले.



जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात या प्रकल्पामुळे मोठी भर पडेल यासाठी जिल्हाधिकारी स्वतः लक्ष देत असून प्रकल्पासाठी माळ सावरगाव, गोळेगाव व निमखेड शिवारातील जवळपास दोन हजार हेक्टर जमीन संपादित करून तिथे कृषीवर आधारित उद्योग, व्यवसाय, शेतमालाची आयात - निर्यात केली जाणार असल्याने शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी या प्रकल्पाला महत्त्व आहे. त्यामुळेच या प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनी, त्यातील अडचणी, शेतकऱ्यांची मागणी यासाठी जिल्हाधिकारी स्वतः शेतकऱ्यांशी संवाद साधून आहेत. उपविभागीय अधिकारी आणि या विषयासाठी स्वतंत्र प्रशासक नियुक्त असून हा प्रकल्प कधी पूर्ण होईल याची सर्वांनाच प्रतीक्षा आहे.

आज, दि. ९ एप्रिल रोजी या संदर्भात बुलडाणा येथे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी सिंदखेडराजातील पत्रकारांशी संवाद साधला. त्यांना या प्रकल्पाविषयी विचारणा केली असता, त्यांनी सरकार या प्रकल्पासाठी सकारात्मक असल्याचे सांगितले. दुसरीकडे जिल्ह्यातील सिंदखेडराजा, लोणार व शेगाव ही महत्त्वाची शहरे अंतर्गत पद्धतीने जोडता येतील का यावर विचार केला जाईल, असे सांगून त्यांनी या शहराचे पर्यटन वाढवण्यावर भर देणार असल्याचे पालकमंत्री यावेळी म्हणाले.

# रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा ...

## उन्हाळी हंगामात १२०४ विशेष एक्सप्रेस धावणार

**मध्य रेल्वे विभागाची माहिती**
**प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता निर्णय**
**बडनेरा, अकोल्यात अनेक गाड्यांना थांबा**

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१०अमरावती** : मध्य रेल्वेने उन्हाळी हंगामात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन नियमित गाड्यांव्यतिरिक्त आतापर्यंत १२०४ उन्हाळी विशेष गाड्या जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये २९० अनारक्षित गाड्या तसेच ४२ वातानुकूलित उन्हाळी विशेष गाड्यांचा देखील समावेश आहे. आता प्रवाशांच्या हितासाठी आणखी सहा अतिरिक्त अनारक्षित विशेष गाड्यांच्या सेवा चालवल्या जाणार आहेत. यातील बहुतांश गाड्यांना बडनेरा, अकोला रेल्वे स्टेशनवर थांबा देण्यात आला आहे.



भिवंडी - सांकराईल अनारक्षित साप्ताहिक विशेष गाडीच्या तीन फेऱ्या होतील. गाडी क्रमांक ०११४९ अनारक्षित विशेष ९ ते २३ एप्रिलपर्यंत दर बुधवारी भिवंडी येथून २२:३० वाजता सुटेल आणि सांकराईलमाल टर्मिनलयार्ड येथेतिसऱ्या दिवशी दुपारी १:०० वाजता पोहोचेल. या गाडीला कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा, नागपूर, गोंदिया, रायपुर, बिलासपुर, झारसुगुडा, राउरकेला, चक्रधरपुर, टाटानगर आणि खड़गपुर येथे थांबा राहणार आहे. १० सामान्य द्वितीय श्रेणी, २ द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १० पार्सल व्हॅन अशी गाडीची संरचना राहणार आहे.

खड़गपुर-ठाणे अनारक्षित साप्ताहिक विशेष गाडीच्या देखील तीन फेट्या होणार आहेत. गाडी क्रमांक ०११५० अनारक्षित विशेष १२ ते २६ एप्रिलपर्यंत दर शनिवारी खड़गपुर येथून २३.४५ वाजता सुटेल आणि ठाणे येथे तिसऱ्या दिवशी १०.३० वाजता पोहोचतील. या गाडीला टाटानगर, चक्रधरपुर, राउरकेला, झारसुगुड़ा, बिलासपुर, रायपुर, गोंदिया, नागपूर, वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, जळगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी आणि कल्याण येथे थांबा राहील.

१० सामान्यद्वितीय श्रेणी, २ द्वितीय श्रेणीसह -गार्ड ब्रेक व्हॅन आणि १० पार्सल व्हॅन अशी गाडीची संरचना राहणार आहे. अनारक्षित विशेष गाड्या आणि कोच साठी तिकिटे सामान्य शुल्कात यूटीएसद्वारे बुक करता येतील. या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी रेल्वेच्या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### प्रवाशांच्या सुविधेसाठी नियोजन

दरम्यान, शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा आता आटोपत आल्या आहेत. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये पर्यटनस्थळी जाण्याकडे प्रत्येकाचा कल असतो. त्यामुळे या सुट्ट्यांच्या दिवसात रेल्वे गाड्यांमध्ये गर्दीचे प्रमाण प्रचंड असते. रेल्वे गाड्यांचे आरक्षण सुमारे दोन ते तीन महिन्यांपूर्वीच फुल्ल होऊन जाते. अशा परिस्थितीत प्रवाशांच्या सुविधेसाठी उन्हाळी विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# अचलपूर ठाणेदाराच्या नावाने बनावट चारित्र प्रमाणपत्र

## कलर प्रिन्ट आऊंट काढल्याने डाव फसला

### गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती** एका माथेफिरू आरोपीने खाजगी कंपनीत नोकरी मिळविण्यासाठी चक्क अचलपुरच्या ठाणेदारांच्या नावाचा वापर करून बनावट चारित्र प्रमाणपत्र बनविले. एवढेच नव्हे तर सही व शिक्का मिळविण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिस अधिक्षक कार्यालयात दाखल सुध्दा केले. परंतु, आरोपीने प्रमाणपत्राची कलर प्रिन्ट आऊंट काढल्याने त्याचा डाव फसला. याबाबत गाडगेनगर पोलिसांनी पोलिस अधिक्षक कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याच्या तक्रारीवरून आरोपी विरोधात गुन्हे दाखल केले आहे. गजानन दौलतराव सावरकर (४२) रा. महिराबपुरा, अचलपुर असे गुन्हे दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, गजानन सावरकर यांना एका खाजगी सुरक्षा कंपनीत सुरक्षा रक्षकाची नोकरी मिळाली होती. कोणत्याही नविन कंपनीमध्ये सुरक्षा रक्षकाची नोकरी मिळविण्यासाठी अर्जदार ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहतो, त्या पोलिस ठाण्याच्या ठाणेदाराच्या स्वाक्षरीचे चारित्र प्रमाणपत्र आवश्यक असते. तसेच त्याच चारिद्र्य प्रमाणपत्रावर संबधीत घटक प्रमुख कार्यालयातील वरिष्ठांचा सही शिक्का सुध्दा मिळवावा लागतो. आरोपी गजानन सावरकर हे अचलपुर शहरात राहत असल्याने त्यांनी अचलपुरच्या ठाणेदाराच्या नावाचा वापर करून स्वतःच्यानावाने बनावट चारिद्र्य प्रमाणपत्र तयार केले. प्रमाणपत्रावर एसबी/ व्हेरफेन / पीव्हीटी। जॉब /००००७५८४५/ २०२५ असे इंग्रजी मध्ये लिहले होते. याबाबतचा ॲप्लीकेशन आयडी क्रमांक एएमजीआर १२२२३०२-१७४८ असा होता. गजानन सावरकर यांनी करल प्रिन्टमध्ये तयार केलेले बनावट चारित्र प्रमाणपत्र पोलिस अधिक्षक कार्यालयात दाखल केल्यानंतर ते संबधीत विभागातील महिला कर्मचाऱ्याच्या टेबलवर पडताळणीसाठी आले. चारिद्र्य प्रमाणपत्राची कलर प्रिन्ट पाहताच ते बनावट असल्याची शंका महिला कर्मचारीला आली. कारण चारित्र प्रमाणपत्र हे कलर प्रिन्टआऊटमध्ये दिल्या जात नाही. विशेष म्हणजे त्या प्रमाणपत्रावर ठाणेदार व आरोपीची डिजिटल स्वाक्षरी सुध्दा नव्हती. त्यामुळे महिला कर्मचारीने वरिष्ठांना माहिती देऊन याबाबत गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी आरोपी गजानन सावरकर याच्या विरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत. पेट्रोलपंप चालकाने काढून दिली प्रिन्टआऊंट गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यापूर्वी पोलिस अधिक्षक कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याने आपल्या स्तरावर चौकशी केली असता आरोपी गजानन सावरकर यांनाते बनावट चारित्रप्रमाणपत्र अचलपुर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील देवडी येथील पेट्रोलपंप चालक खनक अग्रवाल यांनी काढून दिले असल्याचे स्पष्ट झाले. खनक अग्रवाल यांनीच आरोपीला नावट चारित्र प्रमाणपत्राची कलर प्रिन्ट काढूनदिल्याचे पुरावे सुध्दा महिला कर्मचारीने गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत जोडले आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक

# राज्य परिचारी परिवाराच्या पदाचा अमरावती दौरा संपन्न

## परिचारीकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार - राज्य सरचिटणीस सुमित्रा तोटे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती–** महाराष्ट्र राज्य परिचारीका स्थानिक राज्य सरचणी खान सुमित्रा तोटे व राज्य शहाजाद नुकते यांनी, ८ एप्रिलला अमलाला भेट देणारे परिचारी राज्याचे सदस्य व सदस्य प्रश्न व जाणून घेणे, तसेच सोडवणे, राज्यपालांचे राजकारण अंतिम आदेश दिले.

नंतर श्रीमती तो यांच्या अध्यक्षतेच्या स्थानिक स्थानिक व परिचारी सदस्यांबाबत बैठक झाली. या काँग्रेस अमरावती परिचारीका जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल वासी व सदस्य उपस्थित होते. पृथ्वीच्या पुढील वाटचाली यांनी मार्गदर्शन केले. इथल्या स्थानिक पदांचं सदस्या चे कार्य, सभा, स्थानिक समस्यां वाटचाल, तसेच राज्य मंडल ची समस्या समोर आली. पाण्याचे पुढील धोरण आणि संभाव्य आंदोलनाची रुपरेषा नियमावली सर्वसाधारण पणे श्रीमती तोटे यांनी सांगितले.

पत्नी श्रीमती तोटे व श्री. खान राज्याचे मुख्यमंत्री व रूग्णालय अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले सरांची भेट पाहिल परचारिकेला काम करत असताना आपल्याबद्दल सविस्तर चर्चा केली. ठळकपणे सरळ सरळ अधिष्ठाता डॉ. इंगोले यांनी ह्यांनी आदेश दिले.सदस्याचे सदस्य व सदस्य श्री. राहुल लादे, श्रीमती मोनाली गजभिये, श्रीमती अंजली वर्धेकर, श्री. विशाल वडाळ, किशोर खोपे, श्रीमती आरती खानंदे, श्रीमती रंजना खोब्रागडे, शैलेश जोशी, श्रीमती तुलसी वाघमारे, श्रीमती शारदा कोलटके, श्रीमती रश्मी मूल, श्रीमती प्रणाली डोंगरे, श्रीमती कृष्णा सांगळे परिणाम अन्य परिचारीका सदस्य होते.

# फिश हब चे २१कोटी खर्चाचे काम पूर्ण

## मंत्री नितेश राणे व आ.रवी राणा यांच्यात बैठक

### फिश हब ची पाहणी दरम्यान स्थानिक कुशल कामगारांना रोजगार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती –** बडनेरा येथील २१कोटी रुपये खर्चाचा फिश हब चे काम पूर्णत्वास आले आहे. येतीलमासे उत्पादन व फ्रेश मासे मिळावे त्याची गुणवत्ता चांगली राहावी यासाठी आमदार रवी राणा यांनी मत्स्य व्यवसाय मंत्री व आमदार नितेश राणे यांच्या सोबत बैठक घेऊन गोवा ,कोकण, विदर्भ ,तसेच पाच जिल्ह्यातील चांगले काम करणारे सहकारी संस्थेला सहभागी करून घेणार असल्याचे आमदार यांनी सांगितले त्यामुळे फिश हब ची मासे ची चांगली गुणवत्ता राखला जाईल अनेक स्थानिक कुशल लोकांनाही या प्रकल्पात द्वारे काम मिळेल. असे त्या वेळी सांगितले . आमदार रवी राणा यांनी २१ कोटी रुपये खर्चाचे फिश हब व स्टोरेज युनिटची पाहणी केली या स्टोरेजमध्ये समुद्र मासे, विदर्भातील मासे, व इतर ठिकाणाहून आलेले मासे शहरातील पाच जिल्ह्यातून आलेले मासे या ठिकाणी स्टोरेज केले जातील त्याची निरिक्षण, योग्य निगा राखली जाईल.ज्यामुळे अमरावती शहरातील नागरिकांना आपल्या पसंतीचे फ्रेश मासे मिळतील. पाहणी दरम्यान आमदार रवी राणा यांनी अधिकार्यांना उपयुक्त सूचना केल्या यावेळी शहर अभियंता पनपालिया, शहर अभियंता रवींद्र पवार ,कृषी वैद्यकीय अधिकारी सचिन बोंद्रे, उपअभियंता श्रीरंग तायडे ,श्री पावडे, उमेश ढोणे ,सुरेश पडोळे, विलास वाडेकर, शहजाद ,चंदन जाधव, अजून दाते ,सुरेश चुडे ,जाकीर जेमाल ,भूषण दुधेआदी युवा स्वाभिमान पार्टी चे पदाधिकारी व अतिमहत्वाच्या अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# ४०.३४ ग्रॅम एमडी ड्रग्जसह तिघांना अटक

## ८.३२ लाखांचा मुद्देमाल जप्त, विशेष पथकाची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

कारमधून एमडी ड्रग्जची तस्करी करणार्या तिघांना पोलीस आयुक्तांच्या विशेष पथकाने बडनेरा-अकोला मार्गावरून अटक केली. त्यांच्याकडून ४०.३४ ग्रॅम एमडी ड्रग्जसह कार, ३ मोबाइल व वजन काटा असा ८ लाख ३२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई बुधवार, ९ एप्रिल रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास करण्यात आली.

अब्दुल एजाज अब्दुल अजीम (४७) रा. हबीबनगर, अमरावती, शाहरुख खान बिसमिल्ला खान (३०) रा. खुर्शीदपुरा, अमरावती व अविनाश मनोज खांडेकर (२८) रा.जुनी वस्ती, बडनेरा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मुंबईवरून एका कारमधून अमरावतीला विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्ज आणण्यात येत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या विशेष पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर विशेष पथकाने बडनेरा-अकोला मार्गावर सापळा रचून संशयास्पद कार क्रमांक एमएच २७ बीझेड २०११ अडविली. त्यावेळी कारमध्ये अब्दुल एजाज, शाहरुख खान व अविनाश हे तिघे बसून होते. विशेष पथकाने कारची झडती घेतल्यावर त्यात ४०.३४ ग्रॅम एमडी ड्रग्ज आढळून आले. त्यानुसार पथकाने तिघांनाही अटक करून उर्वरितत्यांच्याकडून एमडी ड्रग्ज, कार, ३ मोबाइल व वजन काटा असा एकूण ८ लाख ३२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुद्ध बडनेरा ठाण्यात गुन्हा - दाखल करण्यात आला. ही कारवाई विशेष पथकाचे पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले,साहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश इंगळे, पोलिस उपनिरीक्षक तुषार गावंडे, युसूफ सौदागर, छोटेलाल यादव, रणजित गावंडे, निखिल माहुरे, आशिष डवले, निवृत्ती काकड, संजय भारसाकडे, अमोल मनोहर, नईम बेग, गजानन सातंगे यांनी केली.

### संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जन्मोत्सव सोहळ्यासाठी पंतप्रधानांना निमंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० आळंदी**

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी व आळंदी ग्रामस्थांच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जन्मोत्सवाचे (सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव) आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्त ३ ते १० मे दरम्यान ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना निमंत्रण पाठविण्यात आले आहे. पंतप्रधान मोदी यांची वेळ मिळाल्यानंतर अन्य पाहुण्यांची वेळ आणि कार्यक्रमाचा तपशील जाहीर केला जाणार आहे.या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे आदी उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या कार्यालयाकडून कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. पण, अद्याप तारीख, वेळ निश्चित झालेली नाही. येत्या आठवडाभरात पंतप्रधान कार्यालयाकडून तारीख आणि वेळ निश्चिती होईल. त्यानंतर अधिकृतपणे कार्यक्रमाची रूपरेषा जाहीर केली जाईल, असे आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजनाथ यांनी सांगितले.

# धामणगावात भगवान श्री महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सव

## शोभायात्रेने वेधले नागरिकांचे लक्ष : श्रीमती लालीबाई जैन स्थानकाचे भूमिपूजन
## श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघातर्फे यशस्वी आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०धामणगाव रेल्वे**



श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने भगवान श्री महावीर स्वामी यांचा जन्मकल्याणक महोत्सव,श्रीमती लालीबाई जैन स्थानकाचे भूमिपूजन गुरुवारला (ता.१०) श्रद्धा उत्साहात करण्यात आला.

श्रीमती लालीबाई जैन स्थानकाचे भूमिपूजन विमलादेवी छाजेड यांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार अरुण अडसड, आमदार प्रताप अडसड, अमरावती विभागाचे पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोळके, तहसीलदार अभय घोरपडे, प्रदीप लुनावत, शीतल लुनावत (अमरावती), कोमल बोथरा (अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात जैन श्वेतांबर मंदिरात महाआरतीने झाली. त्यानंतर मंदिरातून प्रभातफेरी (शोभायात्रा) काढण्यात आली.शहरातील प्रमुख मार्गांवरून भूमिपूजन स्थळी पोहोचली.शोभायात्रेत पुरुष आणि महिला पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. श्रीमती लालीबाई जैन स्थानकाचे भूमिपूजन समारंभ आणि नवकार महामंत्र जप संपन्न झाला.भूमिपूजनाचा लाभ विमलादेवी,भूपेंद्र,रवींद्र छाजेड परिवाराने घेतला.यावेळी भूपेंद्र, रवींद्र छाजेड यांच्या सहकार्याबद्दल श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.जैन श्वेतांबर मंदिरात जन्मकल्याणक पूजा पार पडली.या कार्यक्रमाचे संचालन संजय जांगडा यांनी केले.या वेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्थानकाच्या बांधकामामुळे जैन समाजाच्या धार्मिक उपक्रमांना नवे दिशा आणि बळ मिळेल,असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त करण्यात आला.

# मोठ्या सिंचन प्रकल्पातील पाणीपुरवठ्यावरील भार वाढणार

## दोन दलघमीने मागणी वाढण्याची शक्यता




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

तापमानातील वाढीच्या परिणामी पाण्याची मागणी वाढू लागली आहे. मार्च महिन्यापासून दररोज दोन दलघमी पाणी हे पाणीपुरवठ्यासाठी खर्ची पडत असून आगामी अडीच महिन्यांत ती दुप्पट होण्याची शक्यता आहे. विद्यमान स्थितीत जिल्ह्यातील ५६ सिंचन प्रकल्पांत ५०४ दलघमी जलसाठा शिल्लक असून पाण्याची मागणी वाढत असल्याने सिंचन प्रकल्पातील जलसाठ्यावरील भार वाढणार आहे.

जिल्ह्यात अप्पर वर्धा या मोठ्या धरणासह सात मध्यम व ४८ लघुप्रकल्प आहेत. या सर्व प्रकल्पांत विद्यमान स्थितीत ५०४ दलघमी पाणीसाठा शिल्लक आहे. अप्पर वर्धा धरणावर अमरावती शहरासह ग्रामीण पाणीपुरवठा योजना अवलंबल्या आहेत. या धरणाची प्रकल्पीय पाणीसाठा क्षमता ५६४ दलघमी एवढी असून सद्यस्थितीत २८६ दलघमी साठा शिल्लक आहे. पाणीपुरवठा योजनांना सात मध्यम प्रकल्पातून पाणीपुरवठा करण्यात येतो. या प्रकल्पांत १२३ दलघमी तर ४८ लघुप्रकलपात ९४ दलघमी पाणीसाठा शिल्लक आहे. उन्हाळ्याचे अडीच महिने शिल्लक आहेत. गतवर्षी पावसाने सरासरी ओलांडल्याने सिंचन प्रकल्पांत शंभर टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे पाण्यासाठी असलेल्या इतर स्रोतांमध्येही मुबलक पाणी उपलब्ध झाले. मात्र आता सिंचन प्रकल्प कोरडे पडू लागले आहेत

# भुसावल रेल्वे मंडळाचा आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवासी महसुलाच्या विक्रम : ८५८ कोटी रेल्वे महसूल प्राप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अकोला**



रेल्वेच्या तिजोरीत खणखणाट असून मध्य रेल्वेच्या भुसावळ मंडळाने वर्षभरात १६२५.४६ कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त केले. आतापर्यंतचे एका वर्षातील हे सर्वाधिक उत्पन्न आहे. मध्य रेल्वेच्या विविध स्थानकांवरून वर्षभरात तब्बल ४३४.१७ लाख प्रवाशांनी प्रवास केला. रेल्वेच्या तिजोरीत भरघोस उत्पन्न प्राप्त होत असतानाही प्रवासी सेवा सुधारण्याची गरज दिसून येते.

रेल्वेकडे उत्पन्नाचे विविध स्रोत आहेत. गेल्या आर्थिक वर्षात रेल्वेने आपल्या उत्पन्नात मोठी वाढ केली. भुसावळ मंडळामध्ये तिकीट तपासणी मोहीम राबवून साडेसात लाख प्रकरणांमध्ये ५६ कोटीची रक्कम वसूल केली गेली. जाहिरात महसुलात ७.५८ कोटी, तर पार्सल महसूल २९.९६ कोटी प्राप्त झाला. शेतकरी समृध्दी विशेष रेल्वे चालवून २५ फेऱ्याद्वारे एकूण ४३०२.९ टन मालाची वाहतूक केली. त्यातून १.५५ कोटी रुपये मिळाले. भुसावल मंडळाच्या सर्व स्थानकांवर आरक्षित खिडक्या डिजिटल करण्यात आल्या. यूटीएस तिकीट विक्रीत ९४.३४ टक्के वाढ झाली. मालभाडे महसुलाचे लक्ष्य ५९४.८१ कोटी निश्चित केले असताना यातून ६४५.७६ कोटींचा महसूल प्राप्त केला. कॅटरिंग सेवेतून १०.९२ कोटीचे उत्पन्न मिळवले.

भुसावल मंडळाने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवासी महसुलाच्या विक्रमाला पार करत एक ऐतिहासिक उपलब्धी मिळवली. गेल्या वर्षी ८४४.३३ कोटी प्रवासी महसूल मिळवला होता, तर यावर्षी ८५८ कोटी रेल्वे महसूल प्राप्त झाला आहे. यावर्षी तब्बल ४३४.१७ लाख प्रवाशांची संख्या नोंदवली. मागील वर्षापेक्षा पाच टक्केजास्त आहे. लगेज महसुलात देखील वाढ झाली. गेल्या वर्षी १.४९ कोटीवरून यावर्षी २.३८ कोटीचा लगेज महसूल प्राप्त झाला. भुसावल मंडळाने इतर महसुलातून २७.८० कोटींचे उत्पन्न प्राप्त केले. गेल्या वर्षी पेक्षा १२.३४ टक्के वाढ दर्शवते. हा महसूल स्थानक शुल्क, पार्किंग शुल्क, विविध सेवा शुल्क, भाडे आणि इतर संबंधिताकडून मिळाला.

भुसावल मंडळाने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये माल वाहतूक, प्रवासी वाहतूक सेवा आणि इतर कोचिंग महसूल एकत्र करून १६२५.४६ कोटी रेल्वे महसूल म्हणून मिळवला आणि एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. उत्कृष्ट तंत्रज्ञानाचा वापर आणि सतत रेल्वे सेवांमध्ये सुधारणा करण्याच्या प्रयत्नांमुळे उत्पन्न वाढीवर परिणाम झाला आहे. मंडळ रेल्वे प्रबंधक इति पांडे यांच्या नेतृत्वात रेल्वेच्या भुसावळ मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे.

# आधी दीपमाळ तर नंतर भवानी मातेची स्थापना

## १७० वर्षाची इतिहास तर भवानी मातेच्या पुरातन मंदिराला १६० वर्षाचा वारसा

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१०चांदूर बाजार**



चांदूरबाजार तालुक्यातील सुरडी या छोट्याशा गावात दीप माळ १७० वर्षाची इतिहास तर भवानी मातेच्या पुरातन मंदिराला १६० वर्षाचा वारसा आहेसुरुडी या गावांमध्ये भवानी मातेच्या मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही चैत्र नवरात्रीच्या कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडला त्यानिमित्ताने मंदिर परिसरात देवी भागवत सप्ताहाचे आयोजन दिनांक ४/४/२०२५ ते ११/४/२५ करण्यात आले होते या निमित्ताने ११ एप्रिल २०२५ ला भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते याबाबत सप्ताहातील कथावाचक ह भ प सच्चिदानंद महाराज लहाने हे होते त्यांनी आपल्या सुमधुर वाणीतून देवी भागवताचे गावकऱ्यांना कथा ऐकवली या मंदिराची स्थापना व दिप माळ ची स्थापना माधवराव चंडाजी गांजरे यांनी केली त्यानंतर मंदिराचे अध्यक्ष नारायणराव माधवराव गाजरे ही परंपरा नित्यनेमाने दरवर्षी पार पाडत आहेया मंदिरातील भवानी माता ही जागृत असून परिसरातील भाविक भक्त चैत्र नवरात्र शारदिय नवरात्राला मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येतात या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिर स्थापनेपूर्वी दिप माळ करण्यात आली व नंतर सुरेख व जागरूक अशी भवानी मातेची मूर्ती स्थापन करण्यात आली त्यामुळे या मंदिराला विशेष महत्त्व आहे.

# सावंगा विठोबा यात्रेत भक्तांना मारहाण व जबरी चोरीतील मुख्य आरोपीला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०चांदुर रेल्वे**

सावंगा विठोबा येथे गुढीपाडवा सणानिमित्त दर्शनासाठी आलेल्या भाविकांना मारहाण करून मोबाईल व रोख रक्कम जबरीने चोरून नेणाऱ्या टोळीपैकी एकाला स्थानिक ग्रामीण गुन्हे शाखा अमरावती च्या पथकाने अटक केली आहे. दिनांक ३० मार्च २०२५ रोजी रात्री १० वाजता ही घटना घडली होती. फिर्यादी व त्याचे मित्र तलावाजवळ संडासला गेले असताना तीन अज्ञात इसमांनी लाठ्याकाठ्यांनी मारहाण करून त्यांच्याकडील तर्ळी कंपनीचे दोन मोबाईल, Samsung मोबाईल व ६०० रुपयांची रोख रक्कम असा एकूण २६,६०० रुपये किमतीचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून नेला. या प्रकरणी चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी विशेष पथक नेमून तपासाचे आदेश दिले होते. तपासादरम्यान आरोपी सोनल सूरसिंग पवार (वय ३३, रा. मोगरा, ता. जि. अमरावती) यास अमरावती कॅम्प परिसरातून ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक तपासात त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून व्हिवो कंपनीचे दोन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. उर्वरित फरार आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

# दर्यापूर तालुक्यातील थकबाकीदारांवर महावितरणचे लक्ष केंद्रित
# १४,१९३ ग्राहकांकडे १२ कोटी ५९ लाखांवर वीज बिल थकीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० येवदा**



दर्यापूर शहरासह तालुक्यातील संपूर्ण ग्रामीण भाग व अंजनगाव सुर्जी, भातकुली तालुक्यांतील गावे समाविष्ट असलेल्या महावितरणच्या दर्यापूर उपविभागातील एकूण ४९,०४० वीज ग्राहकांपैकी १४ हजार १९३ जणांकडे तब्बल १२ कोटी ५९ लाख १९ हजार ७७१ रुपये वीज बिल थकीत आहे. या थकबाकीदारांनी मुदतीत वीज बिलाचा भरणा न केल्यास त्यांचा पुरवठा खंडित केला जाणार असल्याची ताकीद उपकार्यकारी अभियंता विक्रम काटोले, सहायक लेखापाल सचिन धवने यांनी दिली.

घरगुती ग्राहक व सार्वजनिक पथदिव्यांची सर्वाधिक थकबाकी आहे; मार्च एंडिंगमुळे वसुली व वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई युद्धस्तरावर सुरू आहे. चार महिन्यांत ९९५ मीटरवरील वीजपुरवठा खंडित केला आहे.

**– विक्रम काटोले,**
**उपकार्यकारी अभियंता,**
**महावितरण, दर्यापूर.**

| वीज प्रकार | थकबाकी |
|---|---|
| घरगुती | २,६४,९९,२१० |
| व्यावसायिक | ३५,३४,९४० |
| औद्योगिक | १,१९,०५,४१३ |
| पथदिवे | ७,६१,०१,४४६ |
| पाणीपुरवठा | २४,६१,४६२ |
| सार्वजनिक सेवा | ३३,८८,२९८ |
| इतर | १६,६९,९७१ |
| **एकूण थकबाकी** | **१२,५९,१९,७७१** |

कधीकाळी शहरातील वीजग्राहकांची ९० टक्के वसुली होती. मात्र, गत काही वर्षांपासून बाभळी, बनोसा, दर्यापूर शहर व उपविभागांतर्गत ग्रामीण भागातील विविध प्रकारांतील ग्राहक वीज बिल भरण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने १२ कोटींपेक्षा जास्त थकबाकी झाली आहे. काहींनी दोन ते सहा महिने, तर काहींनी वर्षभरापासून वीज बिल भरलेले नाही. महावितरणने त्यांना मार्च अखेरपर्यंत अल्टिमेटम देऊन कारवाईचा इशारा दिला आहे.

# मंगेशकर कुटुंब म्हणजे लुटारूंची टोळी माणुसकीला लागलेला कलंक -विजय वडेट्टीवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०पुणे**

तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर कडाडून हल्ला चढवला आहे. मंगेशकर कुटुंब माणुसकीला लागलेला कलंक आहे. त्यांनी कधी कुणाला काही दान केले आहे का? खिलारे पाटलांनी त्यांना रुग्णालयासाठी जमीन दान दिली, पण त्यांनी त्यांनाही सोडले नाही, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानाचे तीव्र राजकीय पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

तनिषा भिसे नामक गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय चांगलेच वादात सापडले आहे. या रुग्णालयावर गंभीर स्थिती रुग्णालयात आलेल्या तनिषा यांच्या कुटुंबीयांकडे प्रसूतीसाठी तब्बल १० लाख रुपयांची अनामत रक्कम मागितल्याचा आरोप आहे. या प्रकरणी सरकारने नेमलेल्या चौकशी समितीने दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनावर हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवला आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर टीकेची झोड उठवली आहे.

# भगवान महावीर जयंती उत्सवात साजरी शोभायात्रेने दुमदुमली अंबानगरी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अमरावती शहरात श्री १००८ भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक महोत्सव व श्री मनोकामना सिद्धी विधानाचे आयोजन दहिसाठ चौक, रतन भवन जवळील शतखंडगामा भवनात करण्यात आले होते.उत्सवांतर्गत आयोजित विविध शुभ कार्यक्रमांमध्ये ध्वजारोहण, साकळीकरण, अंगणयास, इंद्रप्रतिष्ठा, मंडप प्रतिष्ठापना आणि अभिषेक व पूजन करण्यात आले.आज भव्य शोभायात्रा काढण्यात आली.सकाळी ७.३० वाजता, भगवान महावीरांच्या मूर्तीला सजवलेल्या रथावर बसवून भव्य शोभायात्रा निघाली. ही शोभायात्रा रतन भवन, दहीसाठ, गांधी चौक, राजकमल चौक, जयस्तंभ चौक, महावीर मंदिर, जवाहर गेट, भाजी बाजार या मार्गे जाईल आणि पुन्हा शतखंडगाम भवनात पोहचली व त्या ठिकाणी समारोप करण्यात आला.जयस्तंभ चौकातील अहिंसा चक्र येथे सकाळी ९ वाजता ध्वजवंदन आणि राष्ट्रगीत म्हणण्यात आले. सकाळी १०.३० वाजता, टांगी आणि भगवान महावीर स्वामी जन्माभिषेक विधी विधिवत पार पडला त्यानंतर ५६ भोग नेवेद्य अर्पण करण्यात आला.

# शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी घेतला विभागाचा आढावा

## शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी भौतिक व शैक्षणिक साधनसामुग्री पुरवा : पंकज भोयर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मुलभूत अधिकार आहे. त्यानुषंगाने शासनाकडून निपूण महाराष्ट्र अभियान, आदर्श शाळा, सी.एम.श्री शाळा, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान असे विविध उपक्रम व विद्यार्थी लाभाच्या योजना राबविल्या जातात. राज्यातील प्रत्येक शाळा ही आदर्श शाळा बनण्यासाठी त्याठिकाणी खासगी शाळांप्रमाणे भौतिक व शैक्षणिक साधनसामुग्री पुरवून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना आज येथे दिले.



येथील महानगरपालिकाच्या सभागृहात आयोजित बैठकीत राज्यमंत्री श्री भोयर यांनी अमरावती विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, शिक्षण उपसंचालक निलिमा टाके तसेच पाचही जिल्ह्यांचे प्राथमिक/माध्यमिक शिक्षणाधिकारी, डायटचे प्राचार्य यावेळी उपस्थित होते.श्री भोयर म्हणाले की, मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत सात कलमी कार्यक्रमाची अमरावती विभागात प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयी व सुविधा, गुंतवणूक प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या सात कलमी कार्यक्रमांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कार्याबाबत राज्यमंत्र्यांनी आढावा घेतला. प्रत्येक तालुक्यात किमान दोन आदर्श शाळा निर्मितीसाठी सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री, आमदार यांना शाळा दत्तक घेण्याची मागणी करुन पालकमंत्री आदर्श शाळा, आमदार आदर्श शाळा निर्मितीसाठी सहाय्यता करण्याबाबत विनंती करण्यात यावी. विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात शिक्षण घेता यावे, यासाठी प्रत्येक शाळेचे दर्जेदार बांधकाम, त्याठिकाणी शुध्द पिण्याचे पाणी व मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह यासारख्या प्राथमिक सुविधांची तजवीज करावी, असेही त्यांनी सांगितले.विभागात ७२ आदर्श शाळांकरिता ६० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यातून नियोजन आराखड्यानुसार सर्व शाळांचे बांधकाम पूर्ण करण्यात यावीत. प्रत्येक शाळेत भौतिक सोयी-सुविधा आणि शैक्षणिक साधनसामुग्री उपलब्ध करुन द्याव्यात. शाळांमध्ये डीजीटल क्लासरुम, पायाभूत सुविधांची उभारणी, ग्रंथालय, खेळाचे मैदान, शुध्द पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आदी प्राथमिक सुविधा निर्माण करण्यात याव्यात.

आदर्श शाळांच्या निर्मितीसाठी समन्वय व देखभाल संबंधी डायटचे प्राचार्यांनी जबाबदारी पार पाडावी. विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात ज्ञानार्जन करता यावे, यासाठी विद्यार्थीहिताच्या दृष्टीने नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यावे, यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधीची तरतूद उपलब्ध करुन दिल्या जाईल, असेही राज्यमंत्री भोयर यांनी यावेळी सांगितले. यावेळी निपूण महाराष्ट्र अभियान, आदर्श शाळा, सीएमश्री शाळा, नवीन राष्ट्रीय धोरण, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान, विविध गुणवत्तापूर्ण व नाविण्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थी लाभाच्या योजना व अंमलबजावणी यासंदर्भात संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून राज्यमंत्र्यांना माहिती दिली.महापालिका प्रशासनाच्या अखत्यारित येत असलेल्या शाळाबाबत व शैक्षणिक सोयी सुविधाबाबत आयुक्त श्री. कलंत्रे यांनी राज्यमंत्री श्री. भोयर यांना सविस्तर माहिती दिली. महापालिकांच्या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण पध्दतीमुळे विद्यार्थी संख्या ६ हजार ५०० वरुन ९ हजार ५०० वाढ झाल्यानिमित्त राज्यमंत्र्यांच्या हस्ते आयुक्त श्री. कलंत्रे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# भाऊसाहेबांना अभिवादन केल्याने उर्जा मिळाली : ना.चंद्रशेखर बावनकुळे

## केंद्राकडे 'भारतरत्न'चा प्रस्ताव पाठविण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन डॉ.पंजाबराव देशमुख यांना 'भारतरत्न' द्या – सर्वच वक्त्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १० अमरावती**

शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ६० व्या पुण्यतिथी सोहळ्यात उपस्थित सर्व पाहुण्यांनी भाऊसाहेबांना यांना 'भारतरत्न' देण्याची मागणी उचलून धरल्याने कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या मागणीचे समर्थन करण्यासोबतच, 'आपण मुख्यमंत्र्यांना समक्ष भेटून महाराष्ट्र शासनाकडून या संदर्भातला प्रस्ताव पाठविण्यासाठी पुढाकार घेऊ, असे आश्वासन दिले.भाऊसाहेबांचे कार्य सर्व देशाला माहित असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी भारतीय समाजाला जगात उंची देण्याचे काम केले त्यामुळे त्यांच्या अभिवादानातून आपल्याला उर्जा मिळाली असून आपण सर्वांनी येथून उर्जा घेऊन समाजातल्या शेवटच्या घटकासाठी कार्य केले पाहिजे, असे आवाहन केले.श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत



झालेल्या या सोहळ्याला महाराष्ट्राचे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, राज्यसभा सदस्य खा.डॉ.अनिल बोंडे, खासदार बळवंतराव वानखडे, आमदार सौ.सुलभाताई खोडके, आमदार प्रवीण तायडे, माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे प्रामुख्याने उपस्थित होते.श्री शिवाजी शिक्षण संस्थेची वाटचाल अतिशय उत्कृष्ट असून हर्षवर्धन देशमुख यांच्या नेतृत्वात संस्था प्रगती करीत आहे.पुढील काळात जगाला मानव संसाधनाची गरज लागणार असून जगातले ६० टक्के मानव संसाधन भारताला पूर्ण करावे लागणार आहे, त्यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेने आधुनिकीकरणाची कास धरून जगातला सर्वोत्तम भारत निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही बावनकुळे यांनी केले.*पंजाबराव देशमुख संकुल उभारू – ना.डॉ.पंकज भोयर*अमरावती जिल्ह्यातील २० शाळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श मॉडेल शाळा म्हणून तयार करण्यात येत असून शिक्षण विभागाच्या अमरावती येथील ६ एकर जागेत शालेय शिक्षण विभागाची सर्व कार्यालये आणून तसेच स्पर्धा परीक्षेचे अद्यावत केंद्र उभारून एक संकुल तयार करण्यात येईल व या संकुलाला डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात येईल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री ना.पंकज भोयर यांनी आपल्या भाषणातून जाहीर केले.

**'डॉ.पंजाबराव देशमुख विमानतळ' असे नामकरण करा – हर्षवर्धन देशमुख**

गेल्या काही वर्षांपासून लोकांच्या माध्यमातून ज्या मागणीचा पुनरूच्चार होत आहे त्या भाऊसाहेबांना 'भारतरत्न देण्याच्या मागणीचा पुनरूच्चार करत अमरावती विमानतळाचे उद्घाटनापूर्वी 'डॉ.पंजाबराव देशमुख विमानतळ' असे नामकरण करावे, अशी मागणी कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी आपल्या भाषणातून केली.जागतिक कृषी प्रदर्शनीमुळे भाऊसाहेबांची प्रसिद्धी जगभर झाली परंतु ते काहींना पटले नाही त्यामुळे त्यांचा दुसऱ्या मंत्रिमंडळात समावेश झाला नाही.काम करणाऱ्या नेत्याला डावलल्यामुळे मोठे राष्ट्रीय नुकसान झाले, असेही ते म्हणाले. क्लस्टर विद्यापीठ करण्यापूर्वी संस्थेच्या शासनाकडे असलेल्या मागण्या पूर्ण करण्यात याव्या तसेच क्लस्टर विद्यापीठाला दरवषी १ कोटी ऐवजी तीन कोटी अनुदान देण्यात यावे,अशी मागणीही त्यांनी आपल्या भाषणातून केली.या कार्यक्रमात ना.चंद्रशेखर बावनकुळे, ना.पंकज भोयर व आमदार प्रवीण तायडे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या व डॉ.देवलाल आठवले यांनी संपादित केलेल्या 'भारतीय संविधान: डॉ.पंजाबराव देशमुख'या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ.देवलाल आठवले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून संस्थेच्या विकासात्मक कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमानंतर स्व. सूर्यकांतादेवी व स्व.रामचंद्रजी पोटे पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी दिलेल्या दाननिधीतून डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात सुरु करण्यात आलेल्या डायलिसीस सेंटरचे उद्घाटन ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले.पाहुण्यांचे स्वागत संस्थेचे उपाध्यक्ष सर्व श्री.ॲड.गजाननराव पुंडकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष श्री.दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य सर्व श्री.हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा.सुभाषराव बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे यांनी केले.तर उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.मनीष श्रीहरी गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाला स्वीकृत सदस्य सर्व श्री.प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, नरेशचंद्र पाटील, डॉ.अमोल महल्ले, संस्थेचे आजीव सदस्य, अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सांगळूदकर महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या चमूने डॉ.राजेश उमाळे यांच्या नेतृत्वात गौरव गीत सादर केले.

# बेलोरा विमानतळावर उद्घाटनापूर्वी तयारी जोरात

## एमएडीसीच्या व्हीसीएमडीकडून अंतिम तयारीचा सुक्ष्म आढावा




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

बेलोरा विमानतळावरून मुंबईला जाणारे पहिले विमान १६ एप्रिल रोजी उडाण घेईल, त्यामुळे आता बेलोरा विमानतळ आता सजवण्यास सुरुवात झाली असून उद्घाटन सोहळ्याची जय्यत तयारी सुरु झाली आहे. या अनुषंगाने बुधवार १६ एप्रिल रोजी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी बुधवारी विमानतळ परिसराला भेट देऊन तयारीचा व्यापक आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हाधिकारी सौरभ कटियार, एमएडीसीचे वरीष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी आणि ग्रामीण पोलिस दलातील अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

अलायन्स एअरच्या मुंबई ते अमरावती या पहिल्या विमान फेरीत वरिष्ठ मान्यवरांचे आगमन होत आहे. उद्घाटन समारंभाचाच्या तयारीचे आणि व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी हा उच्चस्तरीय अधिकाऱ्यांचा दौरा होता.प्रमुख मान्यवर, उच्चस्तरीय अधिकाऱ्यांचे आगमन, सुरक्षा व्यवस्था, मान्यवरांच्या स्वागताची व्यवस्था, फुलांच्या सजावटीसाठी इमारतीच्या भागाकडे विशेष लक्ष देण्यात आले. याठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यासाठी एक मंडप उभारण्यात येत आहे.व्हीसीएमडी स्वाती पांडे यांनी यांनी विविध विभाग आणि एजन्सीं मध्ये समन्वय साधून काम विभाग करण्याचे निर्देश देत संपूर्ण विदर्भासाठी हा ऐतिहासिक कार्यक्रम ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या दिवसाचे प्रोटोकॉल, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सार्वजनिक सहभागाच्या उपाययोजनांना अंतिम स्वरूप देण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

**कडक सुरक्षा व्यवस्था**

एकेकाळी ओसाड असलेले बेलोरा विमानतळ आता गजबजलेले आहे आणि कडक सुरक्षा व्यवस्था देखील दिसून येते. यासोबतच बेलोरा विमानतळाचा रस्ताही सुधारण्यात आला आहे. प्रशासनाने अमरावती-अकोला महामार्गावरील बेलोरा विमानतळाच्या वळणावर एक बोर्डही लावला आहे. जो विमानतळाकडे जाण्याचा मार्ग दर्शवितो. अमरावतीतील बेलोरा विमान तळाच्या उद्घाटनासाठी १६ एप्रिल हा शुभ मुहूर्ततिकिटेही बुक करण्यात आली आहेत. दरम्यान, बेलोरा विमानतळावर उद्घाटन समारंभाची तयारी सुरू झाली आहे. या संदर्भात, अमरावती-अकोला महामार्गावरून बेलोरा विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक क्रॉसिग बनवण्यात आले आहे आणि वळणावरच बेलोरा विमानतळाचा साइनबोर्ड लावण्यात आला आहे.

**रस्त्यावरील दिवे सुरू**

अमरावती-अकोला महामार्गावरून बेलोरा विमानतळाकडे जाणारा रस्ता कालपर्यंत अंधारात होता. पण आता या रस्त्यावर पथदिवे बसवण्यात आले आहेत. याशिवाय, या रस्त्याचीही सुधारणा करण्यात आली आहे.

# अमरावती विमानतळावर नाईट लँडिंगची सोय जूनपर्यंत होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

विदर्भातील अमरावती विमानतळ मुंबई-अमरावती-मुंबई विमानसेवा सुरू करण्यास सज्ज झाले आहे. अमरावती विमानतळाने 'एअर कॅलिब्रेशन ऑफ प्रिसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर' (पीएपीआय) यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. या विमानतळावरून येत्या १६ एप्रिलपासून मुंबई-अमरावती-मुंबई विमानसेवा सुरू होत आहे. मात्र, येथून रात्रीवेळी उड्डाण घेता येणार नाही.




महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाचे हे विमानतळ मात्र नाईट लँडिंग करू शकणार नाही. विमानतळावरील धावपट्टी प्रकाश प्रणालीचे अद्ययावतीकरण करावे लागते. रात्रीच्या वेळी विमानांचे आवागमन करण्यासाठी विमानतळावर डीव्हीओआर हे यंत्र बसवावे लागते. हे यंत्र नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डीजीसीए) परवानगीने घ्यावे लागते. हे यंत्र बसवण्यात आल्यानंतर विमानतळ रात्रीच्या लँडिंगसाठी सुरक्षित आहे की नाही याबाबतची चाचणी घेण्यात येते.भारतातील बहुतांश विमानतळांचे व्यवस्थापन करणारे भारतीय विमानतळ प्राधिकरणच सूर्यास्तानंतरच्या कामकाजात विमान कंपन्यांनी रस दाखविल्यानंतर नाईट लँडिंगची सुविधा पुरविण्यासाठी एका विशिष्ट विमानतळाचा विचार केला जातो. अमरावती विमानतळावर नाईट लँडिंगची सोय जूनपर्यंत होण्याची शक्यता आहे.

# पोलिसांनी हिसका दाखवताच रील स्टार देविदास इंगोले व राणी राठोड यांनी मागितली माफी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

पोलिसांनी हिसका दाखवताच रील स्टार देविदास इंगोले व राणी राठोड यांच डोकं ठिकाणावर आले असून यापुढे आपल्याकडून अशी कधी हि चूक होणार नसल्याचे त्यांनी स्पस्ट केले व झालेल्या प्रकाराबद्दल जनतेची माफी मागितली

समाज माध्यमांवरील रिल्स बनविण्याच्या नादात युवक युवती कशाचीही पर्वा न करता नको ते धाडस करतात. काही बहाद्दर प्रसिद्धीच्या झोतात येण्यासाठी नागरिकांची क्षणिक करमणूक तर करतात, परंतु त्याचा इतर नागरिकांना काय त्रास होणार याची कवडीची चिंता करीत नाहीत. समाजमाध्यमांवरील असाच एक प्रकार मंगळवारी अमरावती शहरात दिवसभर चर्चेचा राहिला.

कलावंत उत्साही चाळीस ते पन्नाशीतील जोडप्याने अमरावती शहरातील बाबा कॉर्नर या अंत्यत वर्दळीच्या चौकात शनिवारी (ता. पाच) भरदुपारी रस्त्यावर उतरून कैसे कटे दिन, कैसे कटी राते, पुछो न साथिया, जुदाई की बाते..., या गाण्यावर सरगम स्टाईल भन्नाट नृत्य सादर केले. त्याची रिल्स समाजमाध्यमावर व्हायरल केली. राणी रंगाची सोनेरी काठपदराची साडी त्यालाच साजेशी बाहेरून करडी व आतुन गुलाबी रंगाची जुती आणि सोनेरी रंगाचे ब्लाऊज घातलेली मध्यमवयीन महिला तर



पिवळ्या रंगाचा पूर्ण बाह्याचा सदरा व पायात करड्या रंगाचा शूज घातलेला मध्यवयीन पुरूषाने या नृत्यात मुख्य भूमिका बजावली. पुरूषाने हातात डफ घेऊन 'सरगम' चित्रपटासाठी लता मंगेशकर, मोहम्मद रफी यांनी गायिलेल्या व ऋषी कपूर, जयाप्रदा यांच्या नृत्यावरील 'डफली वाले डफली बजा... मेरे घुंगरू बुलाते है आ, मै नाचू तू नचा..' या गाण्याला साजेसा डफ वाजवून नृत्यिकेला उत्साहात जबरदस्त साथ दिल्याचे रिल्समध्ये दिसत आहे. हा प्रकार भरदुपारी घडल्याचे त्यात दिसून येत आहे.

यांच्या या वाहतुकीचे नियम मोडून रिल्स बनविण्याच्या बातम्या युसीएन न्यूज सह विविध प्रसार माध्यमांवर प्रसारित होताच पोलसांनी या दोघांनाही शोधून काढत त्यांच्यावर कारवाईचे संकेत दिले मात्र झालेल्या प्रकारची माफी दोघांनेही मागितली त्यावेळी प्रकरण शांत झाले

मात्र या सर्व प्रकरणात चौकात बंदोबस्तसाठी असलेले वाहतूक कर्मचारी या वेळी कुठे होते असा प्रश्न नागरिकांसह पोलीस विभागाला हि पडलं त्यामुळे त्या वाहतूक कर्मचाऱ्यांवर हि कारवाईची टांगती तलवार आहे.